# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 01.06.2025** **वार- रविवार**

---

**कृषीहॅकेथॉन**

देशात आणि राज्यात कृषी क्षेत्राच्या विकासाची प्रचंड क्षमता आहे; कृषी क्षेत्रात शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासाला वाव देऊन अनेक संधीचा लाभ देता येऊ शकतो, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज पुण्यात केलं. राज्याचा कृषी विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ आणि विविध आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहकार्यानं देशातल्या पहिल्या कृषी हॅकेथॉनचं आयोजन करण्यात आलं आहे; त्याच्या उद्घाटन समारंभात पवार बोलत होते. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. शेती केवळ अन्न देण्याची व्यवस्था नसून ती संस्कृती, पर्यावरण आणि अर्थव्यवस्थेचा आधार आहे, हे लक्षात घेऊन सर्व घटकांनी एकत्रित काम केलं तर या डिजिटल युगात राज्यातली शेती ही जगाला दिशा देणारी शेती ठरेल असा विश्वास पवार यांनी व्यक्त केला. शेतीत आधुनिक तंत्रज्ञान, तसंच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यासाठीचं ज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवलं गेलं पाहिजे, असंही पवार म्हणाले. येत्या ३ जूनपर्यंत सुरू राहणाऱ्या या स्पर्धेसाठी एक हजार ८०० जणांनी नोंदणी केली आहे.

**नवलकिशोरराम**

पुणे महापालिकेचे नवनियुक्त आयुक्त नवल किशोर राम यांनी काल आपला पदभार स्वीकारला. माजी आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले सेवानिवृत्त झाल्यानंतर नवलकिशोर राम यांची आयुक्तपदी नियुक्ती झाली

आहे. सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून आणि सर्वांना बरोबर घेऊन पुणे महापालिकेत काम करणार असल्याचं नवल किशोर राम यांनी पदभार स्वीकारताना सांगितलं.

## Pcmc

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने विकसित केलेली खड्डे व्यवस्थापन प्रणाली मान्सूनच्या काळात आता सुरू केली जाणार आहे. यासाठी महापालिकेनं 'पॉटहोल मॅनेजमेंट' हे ॲप विकसित केलं आहे. या ॲपद्वारे नागरिकांना खड्ड्यांबाबतची तक्रार नोंदवता येईल, अशी माहिती पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी दिली आहे.

## चित्रपट

पिंपरी चिंचवड महापालिकेनं आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची काल सांगता झाली. यात 'निर्जली' हा मराठी चित्रपट सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरला, तमिळ भाषेतील 'थुनाई' या लघुपटानं, तसंच 'लेस' या ॲनिमेशनपटानं त्या त्या विभागात बाजी मारली. तीन दिवस चाललेल्या या चित्रपट महोत्सवामध्ये ९०पेक्षा जास्त चित्रपट, लघुपट, माहितीपट आणि ॲनिमेशनपट दाखवण्यात आले.

## राष्ट्रवादी

राष्ट्रवादी काँग्रेसने पुण्यासाठी दोन शहराध्यक्ष निवडले आहेत. माजी आमदार सुनील टिंगरे आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते सुभाष जगताप यांची पुणे शहराध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. टिंगरे यांच्याकडे वडगाव शेरी, कॅन्टोन्मेंट, कसबा आणि हडपसर या चार विधानसभा मतदारसंघाची तर जगताप यांच्याकडे पर्वती, शिवाजीनगर, खडकवासला, कोथरूडची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

## बाजारसमिती

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. पावसामुळे आवक घटल्याने फ्लॉवर, सिमला मिरची, टोमॅटो, वांगी, शेवगा महागले आहेत. पावसाचा फटका जवळपास सर्वच पालेभाज्यांना बसला; त्यामुळे किरकोळ बाजारात पालेभाज्यांचे दर वाढले आहेत. फळ बाजारात गावरान आंब्यांना मागणी वाढली आहे; तर खरबूज, कलिंगड आणि लिंबांचे भाव खाली आले आहेत. फुल बाजारात आवक आणि मागणी स्थिर असल्यानं दरही टिकून आहेत.

**<u>ख्रिस्तीहक्क</u>**

महाराष्ट्रातील ख्रिस्ती बांधवाना राजकीय प्रतिनिधित्व मिळण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं द्रुमकचे राज्यसभा खासदार पी विल्सन यांनी काल पुण्यात सांगितलं. दलित ख्रिश्चनांना संविधानाच्या आधारे सवलती मिळाल्या पाहिजे अशी मागणीही  त्यांनी केली. सहाव्या ख्रिस्ती हक्क परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी विल्सन बोलत होते.

**<u>विद्यार्थीसहायक</u>**

विद्यार्थी सहाय्यक समितीच्या वसतिगृहात मुलींसाठी निवासाची व्यवस्था वाढवल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना पुण्यात उच्च शिक्षण घेणं सोपं होणार आहे. यंदाच्या वर्षासाठी समितीचे प्रवेश सुरू झाले आहेत. उच्च शिक्षणासाठी पुण्यात प्रवेश घेतलेल्या ग्रामीण भागातील गरजू, होतकरू आणि अल्प उत्पन्न गटातील विद्यार्थिनींनी यासाठी अर्ज करावेत, असं समिती व्यवस्थापनाने कळवलं आहे.

**<u>सायबर</u>**

पुणे पोलिसांनी एका सायबर घोटाळ्याचा छडा लावला असून, या प्रकरणी तुषार हरिश्चंद्रे याला अटक केली आहे. डिजिटल अटक केल्याचं भासवून त्यांना एका व्यक्तीची सुमारे साडे सहा कोटी रुपयांची

फसवणूक केल्याची माहिती समोर आली आहे. एका ज्येष्ठ नागरिकाने या प्रकरणी तक्रार दाखल केली आहे.

**हवामान**

पुणे शहर आणि परिसरात आज सकाळी पावसाच्या काही जोरदार सरी आल्या; त्यानंतर दिवसभर ढगाळ वातावरण आहे. आज कमाल ३० आणि किमान २२ पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. उद्या दुपारनंतर ढगाळ वातावरणासह हलक्या पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये नमस्कार.**